**तक्रार क्रमांक : १४/२०१९, ४३०/२०१९ व ६८४/२०१९**

**तक्रारकर्ता, श्री.राजेश बालाप्रसाद पांडे,**
**रा.फुलसावंगी, ता.महागाव, जि.यवतमाळ**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (निवडणुक),**
**तहसिल कार्यालय, महागाव, ता.महागाव, जि.यवतमाळ**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय, महागाव, ता.महागाव, जि.यवतमाळ**

सुनावणी दिनांक २७.०३.२०२६ (In Continuation of order dated ३०.११.२०२३)

आजच्या सुनावणीस अपिलकर्ता अनुपस्थित आहेत. श्री.मोबिन खान महसुल सहायक हे उपस्थित आहेत.

**विवेचन**

आज झालेल्या तक्रार अर्जाच्या सुनावणीस तक्रारदार श्री.राजेश पांडे उपस्थित नाहीत. तथापि, या प्रकरणी द्वितीय अपील क्र.३४७/२०१५ मध्ये दि. ०७.०९.२०१८ रोजी आदेश पारित झाला असून, तत्कालीन मा. राज्य माहिती आयुक्त यांनी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवित कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे.

आयोगाचे वतीने दि. ०७.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अनुपालन अहवाल सादर करण्याविषयी सूचीत करण्यात आले होते तसेच दि. ३०.११.२०२३ रोजी झालेल्या तक्रार अर्जावरील सुनावणीत देखील तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (निवडणूक) महागांव, जि.यवतमाळ, तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, ता.महागांव, जि.यवतमाळ अनुपस्थित असल्याचे आढळून येते.

आज झालेल्या सुनावणीस देखील विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे पुर्वसुचनेशिवाय अनुपस्थित असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, तसेच या संदर्भात कुठलाही अनुपालन अहवाल अद्यापही सादर करण्यात आला नसल्याने महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक **क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)सहा. दि.०१.१२.२०१५ अन्वये** उपरोक्त अधिकाऱ्याविरुध्द जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी वरील शासन परिपत्रकान्वये योग्य ती कार्यवाही करण्याच्या निर्देशासह तसेच यातील द्वितीय अपील क्र. ३४७/२०१५ या आदेशाचे अनुपालन करण्याच्या सक्त निर्देशासह प्रस्तुत तीन्ही तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येते.

**आदेश**

**उपरोक्त आदेशासह प्रस्तुत तीन्ही तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती विभाग

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २७.०३.२०२६**
**प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित,**

**१. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ.**

**जावक क्रमांक** 3237 **दिनांक** 30 APR 2026